# विज्ञान परीक्षा

विज्ञानाचा वापर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या प्रत्येकाच्या घरी, फार मोठ्या प्रमाणात होत आहे. उदाहरणार्थ विजेची इस्त्री, पंखा, रेफ्रिजरेटर, टी.व्ही., रेडिओ, कॉम्प्यूटर, कपडे धुण्याचे यंत्र, मिक्सर, फूड प्रोसेसर, फोन इत्यादी इत्यादी आणि आणखी १५-२० वर्षांनी तो आणखीही फार मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. अशा वेळी आपला विज्ञान विषय कच्चा असून भागणार नाही. विज्ञानाशी जर आपले वाकडे राहिले तर ते परवडणारे नाही. मग मनोरंजक माहितीतून प्रयोग करत-करत आपण जर विज्ञानाशी मैत्री केली, तर काय मौज येईल? यासाठी मराठी विज्ञान परिषद तुमच्यासाठी ७वी, ८वी आणि ९वी च्या मुला-मुलींसाठी मराठी भाषेतून विज्ञानाच्या परीक्षा घेणार आहे. त्याला आपण विज्ञान परीक्षा - प्रथमा, द्वितीया, तृतीया म्हणणार आहोत. तुम्ही संस्कृत, गणित, हिंदी, चित्रकलेच्या परीक्षा देता ना, अगदी तशाच. थोडा-फार फरक सर्वत्र असणारच की नाही? येथे आम्ही काय करणार आहोत ते सांगतो.

विज्ञान परीक्षा प्रथमा, द्वितीया व तृतीयेसाठी अनुक्रमे इ. ७वी, ८वी व ९वी अथवा त्यावरच्या मुला-मुलींना (प्रौढ व्यक्तीसुद्धा) परीक्षेस बसता येईल. जुलै महिन्याच्या २० तारखेपर्यंत इ. ७ वी व ८ वी च्या मुलांना गणित, भौतिकी, रसायन, जीव, दैनंदिन जीवनातील विज्ञान, विज्ञान समस्या, विज्ञान गोष्टी, पुस्तक परीक्षण, घरच्याघरी करता येणारे प्रयोग, छोटे प्रकल्प यांसारख्या विषयांवरील २० ते ४० पानांचा छापील मजकूर पोस्टाने घरपोच मिळेल. हा मजकूर शाळेच्या पाठ्यपुस्तकातील नाही. पण ७वी, ८वी, ९वीच्या मुलांना पेलवेल असा, विज्ञानाविषयी आवड वाढवणारा, थोडा आपल्या भारतीयांनी जुन्या काळात कोणते शोध लावले याची माहिती देणारा अशा स्वरूपाचा असेल. पुस्तिकांबरोबर प्रश्नपत्रिका असणार आहेत. पुस्तिकासमवेत पाठवलेल्या उत्तरपत्रिकेत तुम्ही दिलेल्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे आम्हाला लिहून पाठवायची आहेत. दिलेल्या पुस्तिकांचा तुमचा अभ्यास पूर्ण झाल्यावर तुम्ही उत्तरपत्रिका लिहून पूर्ण करा. पुस्तकांत पाहून उत्तरे लिहिलेली आम्हाला चालतील. म्हणजेच कॉपी केली हा प्रश्नच उरणार नाही. या पुस्तकांतील मजकुराचा अभ्यास तुम्ही केलात एवढे समाधान तुम्हाला आणि आम्हाला पुरे. आम्ही करायला दिलेले प्रयोग तुम्ही करून पाहा. त्यांचे निष्कर्ष आम्हाला कळवा. प्रयोग फसला असला तरी कळवा. येथे कोण पहिल्यांदा यशस्वी झाला आहे? अगदी नोबेल पारितोषिक विजेत्यांनीही चुका केल्या आहेत. मग कळवायला घाबरायचे कशाला? तुम्ही केलेले हे प्रकल्प आम्हाला लिहून कळवायचे आहेत. प्रकल्प, प्रयोग आणि समस्यापूर्तीचा भाग तुम्हाला करावाच लागेल. तो भाग या परीक्षांचा प्राण आहे. तो सोडवला नाही तर तुम्ही नापास होणार. उत्तरपत्रिकेत तुम्हाला प्रत्येक प्रश्नात किती गुण मिळाले, तुम्ही चुकलात कोठे? या शेऱ्यांसह तुमच्या उत्तरपत्रिका तुम्हाला परत मिळतील. सर्व उत्तरपत्रिका गुणपत्रकासह मे महिन्यात मिळतील. त्याच वेळी जे कमीत कमी ४० टक्के गुण मिळवून परीक्षा उत्तीर्ण होतील त्यांना प्रमाणपत्रही मिळेल. शिवाय महाराष्ट्रातील प्रत्येक इयत्तेच्या गुणानुक्रमे पहिल्या ५ मुलामुलींना बक्षिसेही मिळतील. ती अशी - पहिले रु. ७००/-, दुसरे रु. ६००/-, तिसरे रु. ५००/-, चौथे रु. ४००/- आणि पाचवे रु. ३००/-. सर्व विजेत्यांना बक्षिसांची निम्मी रक्कम रोख आणि निम्म्या रकमेची पुस्तके मिळतील. मात्र बक्षिसे फक्त ७वी, ८वी आणि ९वी इयत्तेतील मुलांनाच मिळतील. प्रौढांना बक्षिसे मिळणार नाहीत.

| तपशील | तुम्हाला पोस्टाने मिळावयाची तारीख | उत्तरपत्रिका पोस्टाने आम्हाला पाठवायची शेवटची तारीख |
|---|---|---|
| पुस्तिका | २० जुलै | ३१ डिसेंबर |

**(फक्त उत्तरपत्रिका पाठवा. संपूर्ण पुस्तिका पाठवू नका.)**

प्रथमा परीक्षेसाठी वर्षभराचे शुल्क म्हणून रु. १००/-, द्वितीयेसाठी रु. १२५/- आणि तृतीयेसाठी रु. १५०/- राहील. परीक्षा शुल्काची मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्ट (मुंबईतील मुलांनी चेक पाठवावा अथवा रोख आणून दिले तरी चालतील) **'मराठी विज्ञान परिषद'** या नावाने विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२ या पत्त्यावर पाठवावेत. विद्यार्थ्यांनी स्वत:चे पूर्ण नाव, पालकांचे पूर्ण नाव, पूर्ण पत्ता (पिनकोडसहित) आणि त्यांच्या शाळेच्या नाव व पत्त्यासहित कळवावे. प्रौढांनी शाळेचे नाव वगळून आणि स्वत: प्रौढ असल्याचा स्वतंत्र उल्लेख करून इतर माहिती कळवावी.

या परीक्षांना मार्गदर्शनाचे वर्ग नाहीत की शिकवण्या. तुमचे तुम्हीच शिकायचे ही त्यातली खरी मौज आहे. परीक्षांमुळे तुमचा व्यवहारातील चौकसपणा वाढणार आहे आणि पुढील इयत्तांत जे विज्ञान तुम्ही शिकणार आहात ते समजण्यास तुम्हाला सुलभ जाणार आहे.

सर्व निर्णयांबद्दल परिषदेचे मत अंतिम राहील.

-------------